MHYA150011722017

**नियमित दिवाणी दावा क्र.५०/२०१७**

**गौतम व इतर वि. दत्ता व इतर.**

## निशाणी क्र.८८ खाली आदेश

प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये दावा हा वाटपाकरीता, खुला ताबा मिळण्याकरीता व नुकसान भरपाई करीता दाखल केला आहे तसेच प्रतिदावा हा मालकी घोषित करुन मिळण्याकरीता दाखल केला आहे. प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये मुळ दाव्यातील वादी यांनी निशाणी क्र.८१ वर पुरावा बंद पुरसिस दाखल केली आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र.१ यांनी पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.८४ वर सादर केले आहे.

२. मुळ दाव्यातील वादी व प्रतिवादी यांच्या नामकरणानुसार संभ्रम टाळण्याकरीता व स्पष्टता येण्याकरीता खालील मुद्दयांमध्ये मुळ दाव्यातील वादी व प्रतिवादी याप्रमाणे उल्लेख करण्यात येत आहे. मुळ दाव्यातील प्रतिवादी क्र.१–बी गोपाल मिसळे यांनी निशाणी क्र.४७ वर मुळ दाव्यातील वादी क्र.१ यांच्याविरुद्ध प्लॉट क्र.७२० ची मालकी घोषित करुन मिळण्याकरीता प्रतिदावा दाखल केला आहे.

३. मुळ दाव्यातील वादी यांनी निशाणी ८६ वर दाव्यात व प्रतिवादी क्र.१–बी यांनी निशाणी क्र.८७ वर प्रतिदाव्यात मुद्दे निश्चित होण्याकरीता अर्ज सादर केले, सदरचे अर्ज मंजुर करण्यात आले. तसेच निशाणी क्र.१ वर देखील मुद्दे निश्चित करण्याकरीता आदेश पारीत करण्यात आला. प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये मुळ दावा व प्रतिदाव्याच्या अनुशंगाने मुद्दे निश्चित केल्याचे दिसुन येत नाही. प्रस्तुत प्रकरणातील रोजनाम्याची दस्ताची पाहणी केली असता दिसुन येते की, दिनांक २२.०२.२०२३ रोजी रोजनाम्यावर प्रकरण पुराव्याकरीता ठेवण्यात

आले. प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये मुद्दे निश्चित करण्याचे राहुण गेल्यामुळे न्यायनिवाड्यासाठी मुद्दे निश्चित करणे आवश्यक असल्यामुळे खालीलप्रमाणे मुद्दे निश्चित करण्यात येत आहेत.

## मुद्दे

१. वादी असे सिध्द करतात काय की, दावामिळकत 'अ' व दावा मिळकत 'ब' ह्या मयत तुकाराम उर्फ तुक्या मान्या यांच्या मालकीच्या होत्या ?

२. वादी असे सिद्ध करतात काय की, वादी क्र.१ ते वादी क्र.७ व प्रतिवादी क्र. १–ए ते प्रतिवादी क्र.१–फ हे मयत तुकाराम उर्फ तुक्या मान्या यांचे वारस आहेत ?

३. वादी असे सिद्ध करतात काय की, मयत तुकाराम उर्फ तुक्या मान्या यांना काशीनाथ, तानबा व दत्तु असे तिन मुलं होते ?

४. वादी असे सिद्ध करतात काय की, ते तानबा यांचे मुलं असुन तानबा यांना दावामिळकत 'अ' व दावा मिळकत 'ब' मध्ये मिळणारा १/३ एवढा हिस्सा वेगळा होऊन मिळण्यास ते पात्र आहेत काय ?

५. वादींनी केलेल्या इतर मागण्या मंजुर होण्यास पात्र आहेत काय ?

६. प्रतिवादी क्र.१–बी असे सिद्ध करतो काय की, भिमनगर नेर येथील प्लॉट क्र.७२० हा त्यांच्या मालकीचा आहे ?

७. प्रतिदाव्यात आवश्यक पक्षकार समाविष्ठ केले नसल्यामुळे आवश्यक पक्षकार

या तत्वाची बाधा प्रस्तुत दाव्याला येते काय ?

८. प्रतिदावा हा मुदतीमध्ये दाखल केला आहे काय ?

९. प्रतिवादी क्र.१–बी यांनी केलेली घोषणेची मागणी मंजुर होण्यास पात्र आहे काय ?

१०. आदेश आणि हुकुमनामा काय ?

GAJANAN CHANDRAKANT FULZALKE

Digitally signed by GAJANAN CHANDRAKANT FULZALKE
Date: 2026.06.18 17:46:15 +0530

नेर, (श्री. जी. सी. फुलझळके)

दिनांक – १८.०६.२०२६ दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, नेर.

जि. यवतमाळ.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | B. N. Nare (Grade-III) |
| Court | :- | Civil Judge Jr. Dn., Ner. |
| Date | :- | 18.06.2026 |
| Order signed by the Presiding Officer on | :- | 18.06.2026 |
| Order uploaded on | :- | 18.06.2026 |